# 25 ठाणे लोकसभा मतदार संघ

**146 ओवळा माजीवडा विधानसभा मतदार संघ, भाईंदर (प.),**
**महामानव शिव शाहु फुले आंबेडकर स्मृती सभागृह,बेथनी**
**हॉस्पीटलच्या बाजुला पोखरण रोड न.02 ठाणे(प) 400606**
**EMAIL ID : 146election2024@gmail.com**

**जा.क्र./निवडणुक/कावि- 96 /2023-24** **दि.12 / 04/2024**

निवडणुक तात्काळ

## // प्रसिध्दी पत्रक //

25 ठाणे लोकसभा मतदार संघामधील 146 ओवळा माजीवडा वि.म.संघ कार्यक्षेत्रातील मा. सहा. निवडणुक निर्णय अधिकारी श्रीम. शितल देशमुख, नोडल अधिकारी तथा उपायुक्त (शिक्षण), श्रीम. वर्षा दिक्षित यांच्या मार्गदर्शनानुसार 25 ठाणे लोकसभा मतदार संघातील 146 ओवळा माजीवडा वि.म.संघात मिरा भाईंदर महानगर पालिका क्षेत्रात दि.11/04/2024 रोजी खारीगांव योगा केंद्र, भाईंदर पुर्व येथे साय.06 ते 07.00 पर्यंत व घोडबंदर जे.पी इंफ्रा गृहसंकुल येथे साय. 7.00 ते 8.00 वाजे पर्यंत स्वीप (sveep) अंतर्गत डिजिटल मोबाईल व्हॅन सह जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

146 ओवळा माजिवडा विधान सभा मतदार संघातील स्वीप (sveep) पथक प्रमुख श्री. प्रसाद सातोसकर व कर्मचारी यांनी योगा साधक / ज्येष्ठ नागरीक यांना मतदार नोंदणी व मतदान जनजागृती संदर्भात माहीती देवुन दि. 20/05/ 2024 सोमवार या दिवशी मतदान असल्याने कुठेही फिरायला न जाता सर्व नागरीकांनी मतदार यादीत नाव असलेल्या आपल्या कुटुंबियांस (आई,वडील,भाउ,बहीण, मित्र व शेजारी) मतदान करण्यास प्रोत्साहीत करावे असे आवाहान केले.

तसेच सांयकाळी जे.पी.इंफ्रा गृहसंकुल येथे डिजिटल मोबाईल व्हॅन उभी करुन श्री.जितेंद्र कपुर यांची मतदार नोंदणी व मतदान करणे संदर्भात आवाहन करणारी चित्रफित प्रसारीत करण्यात आली.

सदर कार्यक्रमास 146 ओवळा माजिवडा विधान सभा मतदार संघातील (sveep) पथकातील कर्मचारी वर्ग तसेच योगा साधक / ज्येष्ठ नागरीक व प्रेक्षक वर्ग मोठया प्रमाणात उपस्थीत होते.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी मतदार नोंदणी करुन दि.20/05/2024 रोजी सर्वांनी मतदान करावे तसेच मतदार नोंदणी व मतदार जनजागृतीच्या राष्ट्रीय कार्यक्रमास सहकार्य केल्या 146 ओवळा माजिवडा विधान सभा मतदार संघातील स्वीप (sveep) पथकाने सर्व उपस्थीतांचे आभार मानले.

12.4.2024

(रवी पवार)
उपायुक्त(मु.) तथा जिल्हा नोडल अधिकारी
स्वीप 146 ओवळा माजीवडा वि.म.स.